# नागपुरी बोली : एक भाषाशास्त्रीय अभ्यास

**डॉ. वैजयंती पेशवे**
एसोसिएट प्रोफेसर, मराठी विभागप्रमुख
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर

**सारांश :**

''कोणतीही बोली ही त्या प्रदेशातील संस्कृतीचे प्रतिक असते. त्यामुळे तेथील संस्कृतीचा अभ्यास करतांना तेथील बोलीचा अभ्यास करणे अपरिहार्य असते. म्हणून एखादी संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर तिथली बोलीभाषा टिकवणे, तिचे जतन संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी बोली भाषेचा अभ्यास करणारे अभ्यासक निर्माण व्हावे. तिचे स्वतंत्र भाषाशास्त्र तयार होवून विद्यापीठीय स्तरावर अभ्यासक्रम आखले जावेत. यासाठी सरकारने व विद्यापीठाने प्रोत्साहनपर भूमिका घेणे ही काळाची गरज आहे.''

**प्रस्तावना :**

आज बोलीभाषेच्या अभ्यासाची अतिशय गरज निर्माण झाली आहे. सर्वत्र शिक्षणाचा प्रसार दळणवळणाच्या साधनांची सुलभता, प्रसारमाध्यमांचे सार्वत्रिकरण इ.मुळे ग्रामीण आणि नागरी जीवनच नव्हे तर जागतिक पातळीवरही विविध देश अधिकाधिक जवळ येताहेत. औद्योगिकरणाच्या, विज्ञानाच्या प्रभावामुळे जगात इंग्रजी भाषेचा प्रभाव व महत्त्व आपोआपच वाढीला लागले आहे. इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्यामुळे ङ्गती आलीच पाहिजेफ या अट्टहासापायी मराठी शाळा बंद पडून कॉन्व्हेंट संस्कृती खेड्यापाड्यापर्यंत पोहचली आहे. इंग्रजी येणे आणि इंग्रजीत बोलणे ही प्रतिष्ठेची बाब झाली आहे. अशा परिस्थितीत बोली भाषा जिवंत ठेवणे ही अतिशय कठीण कामगिरी ठरली आहे. कोणतीही बोली ही त्या प्रदेशातील संस्कृतीचे प्रतिक असते. त्या संस्कृतीचा अभ्यास करतांना तेथील बोलीचा अभ्यास करणे अपरिहार्य असते. म्हणूनच एखादी संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर तिथली बोलीभाषा टिकवून ठेवणे, तिचे जतन, संवर्धन करणे फार महत्त्वाचे व आवश्यक असते.

**विषय प्रतिपादन :**

भाषा ही मुलतः अतिशय प्रवाही असते, तिची लोकमान्य व शिष्टमान्य अशी दोन रूपे आहेत. ती लेखनबद्ध झाली की तिला स्थिरता येवू लागते. जेव्हा ती लेखनबद्ध स्वरूपात येवू लागते तेव्हा ती आपोआपच तिच्या मूळ स्वरूपात आवश्यक असणारे बदल स्वीकारत जाते. लेखनमाध्यम म्हणून तिला प्रतिष्ठा मिळाली की ती थोडी स्थिरावते. भाषा ही समाजसापेक्ष असल्यामुळे ती परिवर्तनशील असते.

बोली कशी निर्माण होते? याचा विचार केल्यावर लक्षात येते की, भाषेतील ध्वनीचे संकेत हे समाजनिर्मित आणि समाजमान्य असतात. भाषेत उच्चार व श्रवण या दोन्ही गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात, यांच्या प्रभावानेच भाषा आपल्या मूळ स्वरूपापासून हळुहळू दूर सरकू लागते; तसेच तिच्यात ङ्गबदलण्याची स्वाभाविक प्रवृत्तीफ असते. सामाजिक व्यवहार साभांळतांना प्रत्येक व्यक्तिला उच्चार स्वातंत्र्य असते. त्यामुळे उच्चार प्रक्रियेत बदल होतो. बरेचदा राजकीय व अन्य कारणांमुळे दोन भाषिक परिवर्तन घडून मूळ भाषेहून वेगळी अशी बोली निर्माण होते. ''बोली म्हणजे प्रमाण भाषेशी सामान्यतः जुळणारी पण उच्चार, व्याकरण आणि शब्दसंग्रह या तीनही बाबतीत प्रमाण भाषेपेक्षा काहीसा वेगळा प्रपंच थाटणारी, विशिष्ट स्थानसापेक्ष अशी लोकव्यवहार भाषा होय.''

''बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरुप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्ये''अशी व्याख्या डॉ. ना. गो. कालेलकर यांनी केली आहे.

बोलीची निर्मिती कशी होते या विषयी डॉ. दत्तात्रय पुंडे म्हणतात ''समाजजीवनामध्ये आपोआप निरनिराळे गट किंवा वर्तुळे निर्माण होतात आणि त्या त्या गटाच्या किंवा वर्तुळाच्या जगण्याच्या शैलीला पोषक असे रूप भाषा धारण करते त्यातून बोलींच निर्मिती होत राहते.''

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराची वाटचाल सध्या 'स्मार्ट सिटी' च्या मार्गाने होत चाललेली आपल्याला दिसते. मिहान प्रकल्प, मेट्रो, विविध उच्चस्थरिय विद्यापीठांची